सह-वीज प्रकल्प आस्थापित करणा-या साखर कारखान्यांना ऊस खरेदी करात सूट देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र.अपाऊ-२०१२/प्र.क्र.४९/ऊर्जा-७
दिनांक :- १३ फेब्रुवारी,२०१३.

संदर्भ:- १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.अपाऊ-२००७ प्र.क्र.६९३/ऊर्जा-७, दिनांक १४/१०/२००८
२) शासन शुध्दीपत्रक,उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.अपाऊ- २००७/ प्र.क्र.६९३-अ/ऊर्जा-७, दिनांक २७/१/२००९
३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.अपाऊ-२००९/ प्र.क्र.१५२८/ऊर्जा-७, दिनांक ३ ऑगस्ट, २००९.
४) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.पवन- २०१०/ प्र.क्र.१३४/ऊर्जा-७, दिनांक १४/०७/२०१०.
५) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.अपाऊ-२०१०/ प्र.क्र.३६०/ ऊर्जा-७, दिनांक ३/३/२०११.

**प्रस्तावना**:-

राज्य शासनाच्या "अपारंपरिक ऊर्जा स्रोतांपासून ऊर्जा निर्मितीचे नवीन धोरण – २००८" अंतर्गत संदर्भातील आदेशान्वये, सह-वीज/वीज निर्मिती प्रकल्प आस्थापित करणा-या साखर कारखान्यांना गाळपासाठी येणाऱ्या उसाच्या खरेदीच्या करात १०० % सूट १० वर्षासाठी देण्यात आली आहे. याबाबतच्या कार्यपद्धतीचे अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींचा विचार करुन खालील नमूद पुरक अटी व शर्ती प्रचलित शासन निर्णयातील अटी व शर्तींबरोबर लागू करण्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:-

सन २००६-०७ पूर्वी सह-वीज निर्मिती प्रकल्प आस्थापित करणा-या सहकारी साखर कारखान्यांना, सन २००६-०७ पासून व त्यानंतर कार्यान्वित झालेल्या प्रकल्पांच्या बाबतीत प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून सलग दहा वर्षांकरिता गुंतवणुकीच्या कमाल मर्यादेपर्यंतच ऊस खरेदी करातून सूट उपलब्ध असेल. सदर सूट, सन २००६-०७ पासून कार्यान्वित केलेल्या खाजगी आणि बूट (BOOT) तत्त्वावरील सहकारी साखर कारखान्यांच्या प्रकल्पांच्या बाबतीत कार्यपध्दती विहित केल्यापासून (दि.१४ जुलै, २०१० पासून) आणि दिनांक १४ जुलै, २०१० नंतर आस्थापित झालेल्या प्रकल्पांच्या बाबतीत, प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून देय राहील.

२. सदर सूट उपभोगण्यासाठी खालील अटी व शर्तींची अंमलबजावणी होणे आवश्यक राहील -

१)महावितरण कंपनीस ६ मे.वॅ. वा त्यापेक्षा अधिक अतिरिक्त-पर्यावरण-वीज उपलब्ध करुन देण्याची क्षमता संबंधित प्रकल्पाची असणे आवश्यक आहे.परोक्षित केलेली अतिरिक्त वीज किमान ७५लाख युनिट असणे आवश्यक आहे.

२) संबंधित प्रकल्पाची गुंतवणूकीची कमाल मर्यादा रु.५.०० कोटी प्रती मे.वॅ. इतकी राहील.याकरिता झालेली गुंतवणूक साखर आयुक्तालय व सनदी लेखापालाकडून प्रमाणित करुन सादर करणे आवश्यक राहील. तसेच, या अंतर्गत मिळणाऱ्या लाभाची रक्कम सहवीज निर्मिती प्रकल्पाच्या एकूण भांडवली गुंतवणूकी इतकी होईपर्यंत अथवा १० वर्षाचा कालावधी पूर्ण होईपर्यंत यापैकी प्रथम होणाऱ्या घटनेपर्यंत लागू राहील. यासाठी कारखान्याने प्रत्येक वर्षी विक्रीकर विभागाकडून या अंतर्गत मिळालेल्या लाभाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३) टॉपिंग सायकल कार्यक्षमता ४५ टक्के व त्यापेक्षा अधिक असणाऱ्या प्रकल्पांना ही सूट अनुज्ञेय होईल. त्यासाठी संबंधित प्रकल्पांनी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यांचेकडील प्रमाणपत्र दरवर्षी सादर करणे आवश्यक राहील.

४) यापूर्वी ऊस खरेदी कराची सूट जाहीर केलेल्या वर्षाचा / गाळप हंगामाचाही समावेश या सलग १० वर्षाच्या / गाळप हंगामाच्या कालावधीमध्ये विचारात घेतला जाईल. यासंबंधी विक्रीकर विभाग यांचेकडून आवश्यक संनियंत्रण केले जाईल.

५) साखर कारखान्याने दरवर्षी ऊस गाळपासंबंधी साखर आयुक्तालयाकडील प्रमाणित माहिती महाऊर्जाकडे / संबंधितांकडे सादर करावी.

६) ऊस खरेदी कराच्या सवलतीसाठी विहित करण्यात आलेली अतिरिक्त सहवीज पारेषित करण्याची तसेच किमान वीज क्षमतेची अट ही कारखानानिहाय लागू राहील.

७) सदर सूट देय आहे किंवा नाही याबाबतचे आवश्यक प्रमाणपत्र महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाने (महाऊर्जाने) विक्रीकर विभागास उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. महाऊर्जाने सदर प्रमाणपत्र गाळप हंगाम संपल्यानंतर आणि अर्जदाराने सर्व आवश्यक कागदपत्र सादर केल्यानंतर जास्तीत जास्त ३ महिन्याच्या कालावधीमध्ये द्यावे. सदर प्रमाणपत्र, वित्त विभाग / विक्रीकर विभागास यासोबतच्या जोडपत्र अ प्रमाणे विहित नमुन्यामध्ये द्यावे. या पूर्वीच्या गाळप हंगामाबाबत असे प्रमाणपत्र महाऊर्जाने संबंधित यंत्रणेला तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.

८) सहवीज निर्मिती प्रकल्प आस्थापित करणाऱ्या संबंधित साखर कारखान्यांना ऊस खरेदी कराची सवलत उपभोगण्यासाठी प्रकल्पातील ६ मे.वॅ.वा त्यापेक्षा अधिक अतिरिक्त पारेषित वीज, केवळ महावितरण कंपनीशी वीज खरेदी करार करुन, त्याप्रमाणे महावितरण कंपनीस प्रत्यक्षात वीज पुरवठा करणे आवश्यक आहे.

९) संदर्भाधीन क्रमांक-५ वरील दि.३ मार्च, २०११ च्या आदेशामध्ये नमूद केलेल्या २, ३, व ४ या अटी व शर्ती वगळण्यात / वरीलप्रमाणे सुधारण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१/करा-३, दिनांक १४.१.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक : 201302131600092010 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सि.श.रानडे)
शासनाचे उपसचिव

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई

२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३. उपमुख्यमंत्री / सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

४. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहाय्यक, सर्व मंत्रालयीन विभाग.
१०. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे
११. महालेखापाल, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई (पत्राने)
१४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सूत्रधार कंपनी मर्या., मुंबई.
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., मुंबई.
१६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत, निर्मिती कंपनी मर्या., मुंबई.
१७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., मुंबई.
१८. ऊर्जा उप विभागातील सर्व कार्यासने, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
१९. निवड नस्ती / ऊर्जा-७, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. अपाऊ-२०१२/प्र.क्र.४९/ऊर्जा-७, दिनांक १३ फेब्रुवारी,२०१३ सोबतचे जोडपत्र

**जोडपत्र - 'अ'**

## पात्रता प्रमाणपत्र

मे.------------------------------ यांनी कारखाना स्थळावर -------- मे.वॅ. क्षमतेचा सह-वीज निर्मिती प्रकल्प दि. --------- रोजी कार्यान्वित केला आहे. सदर कारखान्याने सादर केलेल्या लेखापरीक्षकाकडील प्रमाणित माहितीच्या आधारे सदर प्रकल्पाची गुंतवणूक रु. ------ इतकी आहे. कारखान्याने गाळप वर्ष ------- मध्ये ------- टन ऊसाचे गाळप केले आहे.

सदर कारखान्याने महावितरण कंपनी समवेत दि. ----- रोजी वीज खरेदी करार केला असून त्यान्वये १०० टक्के वीज महावितरण कंपनीस देण्यात येते. महावितरण कंपनीकडील प्रमाणित माहितीच्या आधारे सदर सहवीज निर्मिती प्रकल्पातून -------- युनिट्स अतिरिक्त वीज महावितरण कंपनीस पारेषित झाल्याचे निदर्शनास येते. सदर अतिरिक्त पारेषित वीज ७५ लाख युनिट्स पेक्षा जास्त आहे.

सन ------- साठी सदर प्रकल्पाची टॉपिंग सायकल कार्यक्षमता वसंतदादा शुगर इंस्टिट्यूट, पुणे यांनी प्रमाणित केली असून ती --- टक्के म्हणजेच ४५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे.सदर कारखान्याने वित्तवर्ष ------ पूर्वीची ऊस खरेदी कायद्यांतर्गत असलेली थकबाकी भरलेली आहे. राज्य भार पुरवठा केंद्र यांचेकडील माहितीच्या अनुषंगाने ------ गाळप वर्षात सदर कारखान्याने अतिरिक्त वीज महावितरण कंपनीस पुरविली आहे.

या अनुषंगाने मे.------------------------------ यांनी ------ शासन निर्णयातील अटींची पूर्तता केली असल्याने वित्तवर्ष -------- करिता सदर कारखाना ऊस खरेदी करातील सूट मिळण्यास पात्र असून त्यांना त्यानुसार पात्रता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता

-----------